ग्राम पंचायतमार्फत जन्म, मृत्यु
आणि विवाह नोंदणी.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक-व्हीपीएम्-१९६९-४०५५७-ई,
सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १९ जानेवारी १९७०

पहा:- (१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक-व्हीपीएम्-१९६८-३०३९०-ई,दिनांक २१ डिसेंबर १९६८.
(२) जिल्हाधिकारी, अकोला यांचे क्रमांक-२०८०-अ-१ (२)-६९, दिनांक २२ सप्टेंबर १९६९ चे पत्र.

प रि प त्र क
----------

शासन निर्णय क्रमांक-व्हीपीएम्-१९६८-३०३९०-ई, दिनांक २१ डिसेंबर १९६८ अन्वये खेडयांतील जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणीचे काम पूर्वी तलाठी, पोलीस पाटील यांचे मार्फत होत असे. ते काम त्यांच्याकडून काढून दिनांक १ एप्रिल १९६९ पासून ग्राम पंचायतीकडे सोपविण्यात आले. जन्म, मृत्यु व विवाह यासंबंधीचे दिनांक १ एप्रिल १९६९ पूर्वीचे रेकॉर्ड पंचायतीकडे द्यावयाचे किंवा कसे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. याबाबत शासन आदेश देत आहे कीं, दिनांक १ एप्रिल १९६९ पूर्वीचे रेकॉर्ड तहशील कार्यालयांतच ठेवण्यांत यावे. दिनांक १ एप्रिल १९६९ पासूनचे रेकॉर्ड ग्रामपंचायत कार्यालयात राहील.

२. हे परिपत्रक महसूल व वन विभागाशी सल्लामसलत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

द.वि. साळकर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग.

प्रत -
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,



शासमु-रोटा-एव-११८६(१०००-१-७०) (कृ.मा.प.)